# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025



Original Article

# चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेचे मूल्यमापन


**राजेश्वर वारलु काकडे[1], डॉ. विठ्ठल एन. ठावरी[2]**

[1]संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग नेवजाबई हितकरणी महाविद्यालय, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

[2]मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी, ता. चिमुर, जि. चंद्रपूर

**Email:** rajeshwarkakde@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2025-171105

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 11(A)

Pp. 25-29

November. 2025

**Submitted:** 15 Oct. 2025

**Revised:** 25 Oct. 2025

**Accepted:** 10 Nov. 2025

**Published:** 30 Nov. 2025



***गोषवारा***

*प्रत्येकाच्या जीवनात काही स्वप्न असतात. ही स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येकजन परिश्रम घेत असतो. या परिश्रमांना आर्थिक नियोजनाची जोड दिली जात असते. स्वतःचे घर हे त्यापैकीच एक स्वप्न आहे. हे स्वप्न आपल्यापैकी बहुतांशजन पाहतात. परंतु आर्थिक नियोजन आर्थिक परिस्थिती आणि घराच्या किमती बघता हे स्वप्न प्रत्यक्षात उतरते असे नाही. आज शहरी भागात घराच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. हे सर्वसामान्य किंवा आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाच्या आवाक्याबाहेर गेली आहे. एका बाजूला ही गोष्ट खरी असली तरी दुसऱ्या बाजूला गृह खरेदीला प्रोत्साहन मिळावे म्हणून सरकार मदतीचा हात देत आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून आता तुमचे स्वतःच्या घराचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकते. सर्वांसाठी घरे या उद्देशाने केंद्र सरकार प्रधानमंत्री आवास योजना राबवत आहे. 2020 पर्यंत सर्वांसाठी घर हे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा सरकारचा मानस आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश्य म्हणजे देशातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या वाटचालीचा आढावा घेणे हा आहे.*

***शब्द संकेत:*** *घर, योजना, कल्याण, समानता, महिला सशक्तिकरण व पर्यावरण.*


## प्रस्तावना

मानवाला जीवन जगण्यासाठी अनेक गरजाची पूर्तता करावी लागते. त्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण व आरोग्याच्या सोयी सुविधा या मूलभूत गरजा आहेत. त्या मिळविण्यासाठी प्रत्येक व्यक्ती कार्य करीत असतो. स्वतःचे घर असावे हे प्रत्येकाचे स्वप्न असते, परंतु ते स्वप्न सर्वाचेच पूर्ण होत नाही. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ही 1,210,854,977 इतकी असून आजही अनेक कुटुंबांना राहण्यासाठी घरी नाहीत. एक मूलभूत गरज व सर्वांगीण विकास या दृष्टीने प्रत्येकाला स्वतःचे घर असावे हा उद्देश्य समोर ठेवून सरकारने प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली. 2011 च्या जनगणनेनुसार 17,73040 इतके कुटुंब बेघर आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार शहरी भागात 52.9 टक्के तर ग्रामीण भागात 47.1 टक्के एवढी लोकसंख्या आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये 2011 च्या जनगणनेनुसार 210908 कुटुंब बेघर आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यामुळे व आर्थिक समता नसल्यामुळे निवासांचा प्रश्न निर्माण होतो. अनेक कुटुंबे मिळेल तिथे निवारा करतात, फूटपाटवर रात्र काढतात ही समस्या अनेक राज्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात दिसून येते.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 1957 ला ग्रामीण आवास कार्यक्रमाची सुरुवात केली गेली. ज्याद्वारे लोकांना प्रति कुटुंबाला पाच हजार रुपये कर्ज देण्यात आले होते. महाराष्ट्रामध्ये ग्राम विकास व पंचायतराज विभागाद्वारे इंदिरा आवास योजना ही 1985 पासून राबविण्यात येत आहे. ही योजना 1995-96 पासून महाराष्ट्रात स्वतंत्रपणे राबविण्यात येत आहे. या योजनांमध्ये दारिद्र रेषेखालील लोकांना घर उपलब्ध करुन देण्यात असे. केंद्र व राज्य सरकारमार्फत या योजनेचा खर्च 75 : 25 या प्रमाणात निधी पुरवठा केला जातो. जून 2015 पासून इंदिरा आवास योजनेचे नाव बदलून प्रधानमंत्री आवास योजना असे नाव ठेवण्यात आले आहे.

## संशोधनाचा उद्देश

प्रस्तुत शोधनिबंधात प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा घेण्यात येत आहे, त्या अनुषंगाने पुढील उद्देश निश्चित करण्यात आले आहे.

1. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनाचा देशातील विविध राज्यातील प्रगतीचा आढावा घेणे.
2. प्रधानमंत्री आवास योजनामुळे झालेल्या प्रभावाचा आढावा घेणे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:



**Address for correspondence:**

*राजेश्वर वारलु काकडे, संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग नेवजाबई हितकरणी महाविद्यालय, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर*



**How to cite this article:**

*काकडे, . राजेश्वर . वारलु ., & ठावरी, . विठ्ठल . एन . (2025). चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेचे मूल्यमापन. Journal of Research and Development, 17(11(A)), 25–29.* *https://doi.org/10.5281/zenodo.17865973*

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.17865973

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंध लिहिताना द्वितीय समकांचा वापर करण्यात आलेला आहे तसेच काही संकेत स्थळावर प्रकाशित माहितीचा सुद्धा वापर करण्यात आला आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेचा पूर्व इतिहास**

प्रधानमंत्री आवास योजना म्हणजे स्त्री-पुरुषाना भारतीय घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अंतर्भूत असलेल्या निवाऱ्याच्या समान हक्क मान्य करण्याचा दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल होय. शहरी झोपडपट्टी व ग्रामीण भागातील आर्थिक मागास, बेघर, महिला, वृद्ध, अपंग ज्यांना राहण्यासाठी घर नसून त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये राहणीमानाच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी सरकारने आवास योजना सुरु केली आहे. स्वातंत्र्यानंतर स्थलांतरीत लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी भारतात एक आवास कार्यक्रम 1957 ला सुरु करण्यात आला त्याचे नाव व्हिलेज हाऊसिंग प्रोग्राम (VHP) आहे. वर्ष 1960 पर्यंत भारतात विविध भागात जवळपास पाच लाख कुटुंबाला घरे उपलब्ध झाली. या कार्यक्रमांतर्गत लोकांना व सहकारी समित्यांना प्रति कुटुंब पाच हजार रुपये पर्यंत कर्ज दिले गेले. पाचवी पंचवार्षिक (1974-1979) योजनेच्या शेवटपर्यंत योजना अंतर्गत फक्त 67 हजार आवास निर्माण केले गेले. जून 1985 ला इंदिरा आवास योजना सुरु करण्यात आली. त्यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती लोकांसाठी ही योजना सुरु करण्यात आली. 1 जानेवारी 1996 पासून इंदिरा आवास योजना स्वतंत्रपणे सुरु करण्यात येवून त्यामध्ये दारिद्र रेषेखाली लोकांचा समावेश करण्यात आला आहे.

वर्ष 2015 पासून इंदिरा आवास योजना हे नाव बदलून केंद्र सरकारमार्फत प्रधानमंत्री आवास योजना हे नवीन नाव या योजनेला देण्यात आले या योजनांमध्ये घरबांधणीसाठी मैदानी क्षेत्रात 1 लाख 20 हजार रुपये व पूर्व-उत्तर राज्यांसाठी तसेच पहाडी क्षेत्रात राहणाऱ्या लोकांसाठी 1 लाख 30 हजार रुपये आर्थिक मदत दिल्या जाते.

**चंद्रपूर जिल्ह्याची संक्षिप्त माहिती**

प्राचीन काळात 'लोकापूर' या नावाने ओळखला जाणारा जिल्हा चंद्रपूर नावाने प्रचलित आहे. काही काळानंतर त्याचे नाव इंद्रपूर आणि चंद्रपूर असे करण्यात आले. मात्र ब्रिटिशांच्या काळात हा जिल्हा चांदा या नावाने ओळखला जात होता. या प्रदेशात हिंदू आणि बौद्ध राज्याची सत्ता बऱ्याच काळापर्यंत होती. सन 1240 ते 1751 या काळात येते मराठ्यांची सत्ता स्थापित होईपर्यंत गोंड राजाचीच सत्ता होती. मराठी राजे रघुजी भोसले हे सन 1853 मध्ये विनावारस मृत्यू पावल्यानंतर नागपूर प्रांतासहित साम्राज्याला देण्यात आला. सन 1974 पासून चंद्रपूर जिल्हा स्वातंत्र जिल्हा म्हणून गणला जाऊ लागला प्रशासकीय सुविधासाठी जिल्ह्याचे 26 ऑगस्ट 1982 रोजी विभाजन करुन गडचिरोली हा महाराष्ट्र राज्यातील 30 जिल्हा निर्माण करण्यात आला.

महाराष्ट्र राज्यातील एकूण 36 जिल्ह्यांपैकी चंद्रपूर हा एक जिल्हा असून त्याचे क्षेत्रफळ 11,443 चौरस किलोमीटर एवढे आहे. जिल्ह्याच्या पूर्वेस गडचिरोली, उत्तर व पश्चिमेस नागपूर, वर्धा व भंडारा दक्षिणेस तेलंगणामधील आदिलाबाद जिल्हा आहे. चंद्रपूर जिल्हा महाराष्ट्राच्या पूर्वेकडील भागात असून जिल्ह्याच्या पूर्व सीमेवर उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणारी वैनगंगा आणि पश्चिम सीमेवर वाहणाऱ्या वर्धा नदीने जिल्ह्याच्या दोन नैसर्गिक सीमा आखल्या आहे. या जिल्ह्यातील संपूर्ण नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतात. सपाट भागाची सर्वसाधारण उंची जिल्ह्याच्या उत्तर भागात समुद्र सपाटीपासून 900 फूट उंच असून जिल्ह्याच्या दक्षिणेकडील सपाट भागाची उंची 406 फूट आहे. प्रशासकीय रचनेमध्ये जिल्ह्यात एकूण शहराची संख्या 12 असून 1 महानगरपालिका, 6 नगरपालिका, 15 पंचायत समित्या, 827 ग्रामपंचायत व गट ग्रामपंचायत असून 15 तालुके आहेत.

2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे एकूण लोकसंख्या 22,04,307 असून त्यापैकी 11,23,834 पुरुष व 10,80,473 स्त्रिया आहेत. जिल्ह्याचा लोकसंख्या वृद्धीदर 2001 ते 2011 या दहा वर्षाचा काळात 6.4 टक्के एवढा आहे. 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्यापैकी चंद्रपूर तालुक्यात सर्वाधिक 21.8 टक्के लोक राहतात. पोंभूर्णा तालुक्यात सर्वात कमी 2.3 टक्के लोक राहतात. तसेच एकूण लोकसंख्येपैकी 64.8 टक्के लोक ग्रामीण भागात तर 35.2 टक्के लोक शहरात राहतात. जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण 80 टक्के असून ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण 75.5 टक्के व शहरी साक्षरतेचे प्रमाण 88.2 टक्के एवढे आहे. जिल्ह्यात एकूण काम करणाऱ्यांची संख्या 10,58,172 असून ती एकूण लोकसंख्येच्या 48.8 टक्के आहे. 20.9 टक्के शेतकरी, 44.8 टक्के शेतमजूर, 2 टक्के घरगुती उद्योग, 32.3 टक्के लोक इतर सेवेत गुंतलेले आहे. चंद्रपूर जिल्हा औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील विपुल खनिज संपत्तीमुळे 1121 नोंदणीकृत लघुउद्योग, 31 मोठे उद्योग स्थापन झाले आहेत. या मोठ्या उद्योगात प्रामुख्याने ए.सी.सी., अंबुजा, माणिकगड, अल्ट्राटेक, मुरली ॲग्रो असे पाच मोठे उद्योग समूह बल्लारपूर पेपर मिल, लोह पोलाद उद्योग, उद्योग रेफ्रिजरेटर कारखाना, आयुध निर्माण केंद्र या उद्योगाचा समावेश आहे. सध्या स्थितीत 13 औद्योगिक वसाहती, 40 कोळशाच्या खाणी, स्पंज आर्यन निर्माण करणारे 63 उद्योग व आशिया खंडातील सर्वात मोठे औष्णिक वीज निर्मिती केंद्र आहे.

चंद्रपूर जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय शेती असून त्यातून तांदूळ, तूर, हरभरा, ज्वारी, गहू, सोयाबीन, कापूस ही पिके घेतली जातात. त्याचबरोबर 2012 च्या पशु जनगणनेनुसार एकूण पशुधन 8,46,045 एवढे आहे. गायी व बैल 61.1 टक्के, म्हशी व रेडे 8.7 टक्के, मेंढ्या व बकऱ्या 30 टक्के तर घोडे शिंगळे 3 टक्के असून एकूण कुक्कुटपक्षी 5,75,372 इतकी आहे. तसेच सन 2018-19 वर्षात 19,389 हेक्टर क्षेत्र मत्स्य उत्पादनासाठी अनुकूल असून उपयोगात आणलेले एकूण क्षेत्र मात्र 17,132 हेक्टर आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अनुसूचित जातीमधील लाभार्थी 2018-19 या वर्षात ग्रामीण भागातील संख्या 197 व शहरी भागातील संख्या 317 एवढी आहे तर अनुसूचित जमातीमधील लाभार्थी ग्रामीण भागातील संख्या 657 व शहरी भागातील 184 एवढी आहे. तसेच अल्पसंख्याकांची ग्रामीण भागातील संख्या 2 व शहरी भागातील संख्या 111 एवढी आहे. अशा प्रकारे एकूण ग्रामीण भागातील लाभार्थी संख्या 1652 व शहरी भागातील एकूण संख्या 2510 एवढी आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-11(A)| November- 2025

**चंद्रपूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना**

**तक्ता क्र. 1**

| जिल्हा : चंद्रपूर | | | | | | | | संदर्भ वर्ष 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2020 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तालुका | | मंजूर केलेल्या घरकुलांची संख्या | | | | | पूर्ण झालेल्या घरकुलांची संख्या | | | | |
| | | | अ.जा. | अ.ज. | अल्प | इतर | एकूण | अ.जा. | अ.ज | अल्प | इतर | एकूण |
| 1 | वरोरा | ग्रामीण | 3 | 75 | 0 | 250 | 328 | 58 | 118 | 0 | 205 | 381 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | चिमूर | ग्रामीण | 25 | 713 | 0 | 408 | 1146 | 254 | 355 | 12 | 455 | 1076 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | नागभिंड | ग्रामीण | 20 | 143 | 0 | 491 | 654 | 132 | 127 | 12 | 255 | 526 |
| | | नागरी | 70 | 138 | 4 | 301 | 513 | 0 | 0 | 0 | 5 | 5 |
| 4 | ब्रम्हपूरी | ग्रामीण | 82 | 164 | 0 | 973 | 1219 | 298 | 242 | 10 | 417 | 967 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | सावली | ग्रामीण | 5 | 92 | 0 | 216 | 313 | 142 | 225 | 20 | 284 | 671 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | सिंदेवाही | ग्रामीण | 18 | 523 | 0 | 214 | 485 | 140 | 180 | 10 | 172 | 502 |
| | | नागरी | 35 | 10 | 2 | 88 | 135 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | भद्रावती | ग्रामीण | 7 | 183 | 0 | 143 | 333 | 51 | 197 | 0 | 165 | 413 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | चंद्रपूर | ग्रामीण | 3 | 106 | 0 | 216 | 325 | 51 | 184 | 12 | 228 | 475 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 11 | 2 | 0 | 61 | 74 |
| 9 | मूल | ग्रामीण | 2 | 91 | 0 | 43 | 136 | 148 | 270 | 20 | 304 | 778 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | पोंभूर्णा | ग्रामीण | 11 | 76 | 0 | 127 | 214 | 57 | 114 | 0 | 173 | 344 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 36 | 36 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | बल्लारपूर | ग्रामीण | 0 | 3 | 0 | 28 | 31 | 22 | 45 | 12 | 81 | 160 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | कोरपना | ग्रामीण | 0 | 88 | 0 | 75 | 163 | 25 | 60 | 0 | 121 | 206 |
| | | नागरी | 11 | 4 | 19 | 153 | 187 | 0 | 0 | 1 | 7 | 8 |
| 13 | राजूरा | ग्रामीण | 2 | 19 | 0 | 95 | 116 | 56 | 96 | 0 | 136 | 288 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6 | 3 | 5 | 51 | 65 |
| 14 | गोंडपिपरी | ग्रामीण | 9 | 95 | 0 | 84 | 188 | 98 | 200 | 12 | 226 | 536 |
| | | नागरी | 12 | 30 | 3 | 138 | 183 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 15 | जिवती | ग्रामीण | 63 | 166 | 0 | 246 | 475 | 110 | 152 | 0 | 115 | 377 |
| | | नागरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण | | ग्रामीण | 250 | 2267 | 0 | 3609 | 6126 | 1678 | 2565 | 120 | 3337 | 7700 |
| | | नागरी | 128 | 182 | 28 | 716 | 1054 | 17 | 5 | 6 | 124 | 152 |

**स्त्रोत : अर्थ व सांख्यिकी विभाग चंद्रपूर जिल्हा, महाराष्ट्र शासन.**

1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2020 या कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात ग्रामीण भागातील मंजूर केलेल्या घरकुलाची एकूण संख्या 6126 असून त्यापैकी पूर्ण झालेल्या घरकुलची संख्या 7700 आहे, तसेच शहरी भागात मंजूर केलेल्या घरकुलांची एकूण संख्या 1054 आणि पूर्ण झालेल्या घरकुलांची एकूण संख्या 152 आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेची विशेषता**

1. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत केंद्र सरकारमार्फत मैदानी क्षेत्रात घर बांधण्यासाठी 1 लाख 20 हजार व पहाडी क्षेत्रासाठी 1 लाख 30 हजार रुपये निधी दिला जातो. तसेच केंद्र व राज्य सरकारमार्फत या योजनांचा खर्च 75 : 25 या प्रमाणात निधी पुरवठा केला जातो.
2. शौचालय बांधून देण्यासाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्र सरकार मार्फत 12 हजार रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
3. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उत्पन्नानुसार वर्गीकरण करुन कमी व्याजाच्या दराने कर्ज घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

4. प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत देण्यात येणारी घरे महिलांच्या नावाने देण्यात येत आहे.
5. प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये घरासोबत स्वयंपाक रुमची व्यवस्था करण्यात आल्यामुळे पूर्वीपेक्षा भूभाग क्षेत्र वाढवण्यात आले आहे.
6. शुद्ध पाणी, एलपीजी गॅस कनेक्शन, विज कनेक्शन इत्यादी योजनेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
7. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे ग्रामीण भागातील बेकारी वर्गांना रोजगार प्राप्त होत आहे.
8. घर बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंना मागणी वाढल्याने संबंधित उद्योगांचा विस्तार होत आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेचा उद्देश**

1. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ वर्ग समूहाला मदत करणे.
2. श्रीमंत व गरीब या दोन वर्गात असलेली विषमता कमी करणे.
3. वर्ष 2022 पर्यंत 1 करोड घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ वर्गाला उपलब्ध करुन देणे.
4. रिटायर व शहीद सैनिकांच्या कुटुंबांना घरे मंजूर करुन देऊन आर्थिक सहाय्य करणे.
5. विधवा महिला, विकलांग व्यक्ती व अल्पसंख्याकांना मदत करणे.

**प्रधानमंत्री आवास योजनासाठी लाभार्थी पात्रता**

आवास योजना अंतर्गत घरकुल मिळण्यासाठी पुढील प्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

1. **कौटुंबिक स्थिती :** पती, पत्नी आणि अविवाहित मुलांचे कुटुंब हे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत निर्धारित केलेल्या मापदंडानुसार घरे मानले जाते. या योजनेअंतर्गत लाभासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थीकडे भारताच्या कोणत्याही भागात त्यांच्या नावावर किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावावर पक्के घर नसावे.
2. **घराची मालकी :** 21 चौरस मीटरपेक्षा कमी पक्के घर असलेल्या लोकांना सध्याच्या प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये समावेश केले जाऊ शकते.
3. **वैवाहिक स्थिती :** विवाहित जोडप्यांच्या बाबतीत पती पत्नीपैकी एक किंवा दोघेही एकत्र मालकीमध्ये एकाच घरासाठी पात्र असतील, जर त्यांनी योजनेअंतर्गत कुटुंबाच्या उत्पन्नाचा पात्रतेचा निकासाची पूर्तता केली असेल.
4. **श्रेणी :** ई. डब्ल्यू. एस. (EWS) श्रेणीतील लाभार्थी मिशनच्या चारही अनुलंबामध्ये पात्र आहे तर LIG/MIG श्रेणी केवळ मिशनच्या (CLSS) घटकांतर्गत पात्र आहे. एस. सी. व एस. टी. तसेच ओ.बी.सी. प्रवर्गातील लोक EWS आणि LIG मधील महिला देखील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र आहे.

**सन 2023 मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रगती**

**तक्ता क्र. 2**

| अ.क्र. | राज्य | लक्ष्य | राज्याने मंजूर केलेली घरे | 24 मार्च 2023 पर्यंत पूर्ण झालेली घरे |
|---|---|---|---|---|
| 1 | अरुणाचल प्रदेश | 38,384 | 36,255 | 12,555 |
| 2 | आसाम | 20,84,070 | 18,29,972 | 10,96,571 |
| 3 | बिहार | 38,64,565 | 37,03,934 | 35,18,034 |
| 4 | छत्तीसगढ | 11,76,150 | 11,76,061 | 8,55,349 |
| 5 | गोवा | 1,707 | 257 | 143 |
| 6 | गुजरात | 6,33,772 | 5,80,869 | 4,04,610 |
| 7 | हरियाणा | 30,789 | 29,341 | 24,277 |
| 8 | हिमाचल प्रदेश | 15,483 | 15,451 | 12,256 |
| 9 | जम्मू व काश्मीर | 2,01,230 | 1,99,454 | 1,39,502 |
| 10 | झारखंड | 16,03,268 | 15,92,824 | 14,70,091 |
| 11 | केरळ | 42,212 | 35,231 | 27,898 |
| 12 | मध्य प्रदेश | 37,76,584 | 37,58,218 | 33,23,106 |
| 13 | महाराष्ट्र | 14,71,359 | 14,13,423 | 10,28,847 |
| 14 | मणिपूर | 46,166 | 43,308 | 20,020 |
| 15 | मेघालय | 80,848 | 70,113 | 35,171 |
| 16 | मिझोरम | 20,518 | 20,512 | 6,524 |
| 17 | नागालँड | 24,775 | 22,987 | 5,873 |
| 18 | ओरिसा | 26,95,837 | 26,51,822 | 17,17,399 |
| 19 | पंजाब | 41,117 | 40,322 | 27,270 |
| 20 | राजस्थान | 17,33,959 | 17,20,379 | 16,02,365 |
| 21 | सिक्कीम | 1,409 | 1,409 | 1,102 |
| 22 | तामिळनाडू | 8,17,439 | 7,80,116 | 4,99,862 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | त्रिपुरा | 2,82,238 | 2,56,175 | 2,11,956 |
| 24 | उत्तर प्रदेश | 34,78,718 | 34,72,518 | 26,06,934 |
| 25 | उत्तराखंड | 47,654 | 46,771 | 27,976 |
| 26 | पश्चिम बंगाल | 46,18,847 | 45,70,344 | 33,99,627 |
| 27 | अंदमान व निकोबार | 1,631 | 1,347 | 1,195 |
| 28 | दादर व नगर हवेली | – | – | – |
| 29 | दमन व दीव | 6,831 | 6,343 | 3,451 |
| 30 | लक्ष्यद्विप | 53 | 53 | 44 |
| 31 | पॉंडेचरी | – | – | – |
| 32 | आंध्र प्रदेश | 2,56,270 | 2,46,425 | 48,857 |
| 33 | कर्नाटक | 3,07,746 | 1,86,575 | 1,01,678 |
| 34 | तेलंगणा | – | – | – |
| 35 | लडाख | 1,992 | 1,906 | 1,429 |
| **एकूण** | | **2,94,03,621** | **2,85,09,915** | **2,22,31,972** |

**स्त्रोत : गृहनिर्माण मंत्रालय, भारत सरकार.**

**प्रधानमंत्री आवास योजनेचा परिणाम**

प्रधानमंत्री आवास योजना ही देशातील गरीबी निर्मूलन, सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. सदर योजनाचा पुढीलप्रमाणे परिणाम झालेला दिसून येतो.

**1) महिला सशक्तिकरण :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत महिलांच्या नावाने घर उपलब्ध होत असल्यामुळे महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून महिला सक्षमीकरण स्थापीत होत आहे.

**2) मूलभूत सुविधा :** प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत घरबांधणी बरोबर इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उदा. वीज कनेक्शन, गॅस कनेक्शन, स्वच्छ पाण्याची सोय इत्यादी यामुळे ग्रामीण भागातील राहणीमानात सुधारणा होण्यास मदत होत आहे.

**3) ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती :** आवास योजना मोठ्या प्रमाणात सुरु करण्यात आल्यामुळे आर्थिक घटकांना प्रोत्साहन मिळून गुंतवणूक होत आहे, त्यांचा परिणाम होऊन रोजगार निर्मिती झाली, त्यामुळे लोकांना रोजगार मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती प्राप्त झाली आहे.

**4) गरिबी निर्मूलन :** सरकारमार्फत गरीब लोकांना घर उपलब्ध होत असल्यामुळे एक प्रकारची आर्थिक सहाय्य मिळत आहे. त्यांच्या जीवनात सुधारणा होत आहे. गरीबी दूर करण्याचा आवास योजना मार्फत प्रयत्न सरकार करीत असल्याचे दिसून येतात.

**5) सकारात्मक पर्यावरणीय प्रभाव :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सक्षम घरबांधणी सोबत मूलभूत सुविधा उपलब्ध होत आहे. उदा. गॅस कनेक्शन, स्वच्छ पाणी पुरवठा, शौचालय इत्यादी त्यामुळे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होत आहे.

**6) सामाजिक समानता :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मजदूर, अल्पसंख्या आणि विकलांग व्यक्ती इत्यादी दुर्बळ घटकांना प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये प्राथमिकता दिल्यामुळे समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित होऊन समानता निर्माण होत आहे.

**निष्कर्ष**

देशातील ग्रामीण भागातील घरांची कमतरता दूर करण्यासाठी सरकारने इंदिरा आवास योजनांची पुनर्रचना प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भागामध्ये 1 एप्रिल 2016 पासून केली आहे. प्रधानमंत्री आवास योजनाचा कार्यक्रम भारतातील खेड्यापाड्यातील कच्च्या घरांच्या जागी पक्की घरे आणण्याचे उद्दिष्ट आहे. डिसेंबर 2021 मध्ये मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री आवास योजनाला मार्च 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत 2.95 कोटी घरांच्या एकूण उद्दिष्ट पैकी 2.85 कोटी घरे राज्यांना वाटप करण्यात आली आहे. 74,08,086 पूर्णपणे महिलांच्या नावावर आणि 1,26,08,673 पती आणि पत्नी नावावर संयुक्तपणे मंजूर करण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे महिला सक्षमीकरण, रोजगार निर्मिती, गरिबीमध्ये कमी, सामाजिक समता इत्यादी बाबीवर प्रभाव पडून ग्रामीण विकास होत आहे. देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री आवास योजना एक गेम चेंजर म्हणून समोर येत आहे.

**संदर्भ सूची**

1. सोळूंके आर. एस. आणि काकडे व्ही.बी. 'भारतीय अर्थव्यवस्था', श्री. विद्या प्रकाषन प्रथम आवृत्ती, पुणे, 2003.
2. कुलकर्णी बी.डी., ढमढरे एस.व्ही. (2007): "अर्थषास्त्रीय संषोधन पद्धती", डायमंड पब्लिकेषन्स, नागपूर.
3. मायी सुनील (2009): "भारतीय समाज प्रष्न आणि समस्या", डायमंड पब्लिकेषन्स, पुणे.
4. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुळकर्णी मृणाल (2014): "सामाजिक संषोधन पद्धती", श्री साईनाथ प्रकाषन, नागपूर.
5. सोळूंके आर. एस. 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', कौमास पब्लीकेषन, औरंगपूरा, औरंगाबाद, तृतीयावृत्ती, 2003.
6. इंगोले मुरलीधर (2012): "वाषिम जिल्ह्यातील इंदिरा आवास योजनेचा चिकित्सक अभ्यास", पीएच.डी. षोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
7. https://housing.com
8. https://www.housing.com
9. https:// rdd. Maharashtra.gov.in.